शिक्षणाच्या नवप्रवाहातील अध्यापकांची भुमिका

श्री धायगुडे बाळासाहेब विनायकराव
एम.ए. (मराठी), एम.एड्. डी.एस.एम.
मु. पो. बनसारोळा ता. केज जि.बीड

प्रास्ताविक

शाळा ही सामाजिक संस्था असून ह्या संस्थेच्या माध्यमातूनच उद्याचे भविष्य आकारत असते. उद्याच्या भावी नागरिकांना घडविण्याचे कार्य अध्यापकाकडून होत असते. मूले ही अनुकरण प्रिय असतात. मोठ्यांच्या चांगल्या व वाईटगुणांचे ते अनुकरण करतात. शालेय / माध्यमिक तसे उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचे वय संस्कारक्षक असते त्यामुळे आपण संस्कारांची बीजे त्यांच्यासाठी जशी रोवू, त्याप्रमाणे त्याचे व्यक्तीमत्त्व घडते. संस्काराच्या रोपणाची सुरुवात घरापासून होत असली तरी, वय वर्षे ६ नंरतच औपचारिक बालकांचा दैनंदिन जीवनातील जास्तीत जास्त कालावधी शिक्षणासाठी शाळेतच जात असतो. त्यांचे आचार विचार राहणीमानाएवढेच नव्हे तर एकूणच व्यक्तीमत्त्वावर आई नंतर प्रभाव टाकणारा दूसरा महत्त्वाचा घटक म्हणजे शाळा व त्यातील शिक्षक होय.

त्यामुळेच **टिनडॉल** यांनी अध्यापकाच्या व्यवसायाबद्दल पूढील उद्गार काढले आहे. **'जर एखादा अत्यंत महत्त्वाचा व्यवसाय असेल तर माझा असा विश्वास आहे की तो शालेय शिक्षकाचा होय.'**

म्हणूनच संत कबीर म्हणतात

'गुरू गोविंद दोनो खडे, काके लागू पाय,
बलीहारी गुरु अपने, जीन गोविंद दियो बनाया'

गुरु व गोविंद हे दोघे जर माझ्या समोर उभे राहिले तर मी गुरुचीच प्रथम पुजा करीन, कारण त्यांच्यामुळेच मला मुक्तीचा परमेश्वर प्राप्तीचा मार्ग् सापडला.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे 'जो लघु नाही तो गुरु' ज्याचे आचार, विचार, वर्तन, व्यक्तीमत्त्व सर्वच विशाल असते. ज्याच्याकडून ज्ञानाचे संस्कार, सामाजिकतेसाठीची सभ्यता प्राप्त होते. त्यामुळे अध्यापकांची केवळ पोषाख व शरीरयष्टी सुंदर असून चालत नाही तर तो त्याच्यातील सप्त गुण, विचार, अंतर - बाह्यवर्तन या सर्वासह आदर्शच हवा. व्यक्तीमत्व म्हणजे, 'अंतर व बाह्य गुणांची गोळा बेरीज होय', असे म्हटले जाते. त्यामुळे आपल्या व्यक्तीमत्त्वांची छाप अध्ययनार्थीवर अध्यापकाला पाडता आली पाहिजे. त्यासाठी त्यांचे अंगी विविध कला कौशल्ये असावित. आचार, विचार, अभिवृत्ती, अभियोग्यता, व्यावसायिक मूल्ये, कार्यावर श्रध्दा व विश्वास, व्यावसायिक समाधान आदी गुणांचा संचय त्यांच्या व्यक्तीमत्त्वामध्ये हवा.

अपेक्षित शिक्षक –

आजचे युग ज्ञानाचे, तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे ज्ञानसंपन्नता हा गुण अध्यापकामध्ये असावा. कमाल ज्ञानाची पातळी प्राप्त करणे व प्राप्त ज्ञान कायम अद्ययावत ठेवणे यासाठी सातत्याने त्याने प्रयत्न करावेत. स्वतः ज्ञानार्जनासाठी कष्ट करून, इतरांना ज्ञानी करण्याची तयारी अध्यापकाने ठेवावी. मुद्रित - अमुद्रित, दृक-श्राव्य साधनांद्वारे जास्तीत जास्त अध्ययन होते त्यामुळे अध्यापनासाठी त्या साधनांचाच उपयोग करावा. शाळेच्या भिंती ह्या बोलक्या कराव्या. अध्ययन अनुभव देण्यासाठी विविध सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून, अध्ययनार्थीसाठी व्यक्तीमत्व विकासाच्या संधी निर्माण कराव्यात. त्यांच्या कृतीशिलतेला वाव देण्यासाठी विविध प्रकल्प,

शैक्षणिक व सामाजिक उपक्रम अभ्यासक्रमानुसार अध्ययनार्थींना देण्यात यावे. प्रकल्प देतांना अध्ययनार्थीचे वय, आशय व त्यासाठी येणारा अपेक्षित खर्च याचा विचार करुनच द्यावा. अन्यथा प्रकल्प बालकांसाठी (अध्ययनार्थीसाठी) व कृती पालकासाठी असे होते. बालकांच्या मूल्यमापनाऐवजी पालकाचेच मूल्यमापन केले जाते. व गुण मात्र बालकाला देण्यात येतात. असे घडू नये याची काळजी अध्यापकाने घ्यावी.

अध्ययनार्थीच्या सुप्त गुणांच्या विकासासाठी विविध गुण व कला कौशल्ये अध्यापकाने अंगीकारावीत त्याचा आपल्या अध्यापनात सृजनात्मक पध्दतीचे वापर करून अध्ययनार्थीचे अध्ययन रंजक व परिणाम कारक कसे होईल हे पाहावे. आपण शिकवतो म्हणूनच मूले शिकतात, ही जुनी विचार सारणी बाजूला ठेववी. कारण अध्ययन ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. अध्यापकाने फक्त अध्ययनार्थीच्या अध्यापनाला दिशा व गती देण्यासाठी प्रेरणा द्यावी. प्रेरणा ही अध्ययनासाठी खूपच महत्त्वाची असते. आपले विचार अध्ययनार्थीवर न लादता त्यांच्यातील सुप्तगुणांना वाव द्यावा त्यांना जास्तीत जास्त बोलते करण्यासाठी चर्चा पध्दती, प्रश्नोत्तर पध्दती, नाट्यीकरण पध्दती या सारख्या कृतीपधान पध्दतींचा उपयोग करावा. अध्ययनार्थीला अभिव्यक्त होण्यास प्रोत्साहित करावे. त्यासाठी अध्यापक हा उत्तम कलाकार झाला पाहिजे.

विविध सामाजिक उपक्रम हाती घेऊन अध्ययनार्थीत सामाजिक जबाबदारीची जाण व भान कसे निर्माण करता येईल, याकडे लक्ष देऊन सामाजिक बदलाचा अग्रदूत म्हणून अध्यापकाने भूमिका करावी. सामाजिक बांधिलकी अध्ययनार्थीत निर्माण करावी.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात वावरतांना 'सर्वच जुने ते सोने' ही विचार सरणी बाजुला ठेऊन किंवा 'नवे ते सर्वच हवे' या उक्ती प्रमाणे कार्य न करता. आपल्या वैचारिकतेनुसार व विज्ञानाच्या आधारावर टिकणाऱ्या गोष्टिंचा स्विकार करण्याची अध्ययनार्थीत क्षमता विकसित करावी.

अध्ययनार्थीच्या शैक्षणिक समस्या व वैयक्तिक अडचणी सोडविण्यासाठी त्याने पूढाकार घ्यावा. त्यासाठी मानसशास्त्रीय पध्दतींचा वापर करावा. अध्यापनाची सूत्रे, तत्वे, पध्दती यांच्या सहाय्याने वर्गात अध्ययन-अध्यापनासाठी पोषक निर्माण वातावरण करावे. प्रयोगशिलता व नाविण्य ह्या बाबी अध्यापकाच्या अध्यापनात असाव्यातच अध्ययन कर्त्याची मानसशास्त्रीय गुणवैशिष्ट्ये लक्षात घेऊन आशय ज्ञानाची मांडणी करावी जेणेकरुन वर्गातील सर्वच अध्ययनार्थीचे अध्ययन हे सहज सूलभ व परिणामकारक होईल.

शैक्षणिक दृष्ट्या नेहमीच प्रगत राहण्यासाठी व अध्ययनार्थीला नित्य नवीन अध्ययन अनुभव देण्यासाठी अध्यापकाने सतत नवीन-नवीन ज्ञान स्वतः अध्ययनार्थी बनून आत्मसात करावे. या शिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे अपेक्षित शैक्षणिक पात्रता पूर्ण केल्याशिवाय अध्यापकांची अध्यापन कार्यासाठी शैक्षणिक संस्थेने / व्यवस्थापन मंडळाने नेमणूकच करू नये काही अपवादात्मक परिस्थितीत सामाजिक सर्वच घटकांना न्याय देण्यासाठी अपात्रता धारक व्यक्तींची अध्यापक म्हणून नियूक्ती केल्यास त्यांचे कडून शैक्षणिक पात्रता किमान कालावधीत पूर्ण करुन घ्यावी. आशय ज्ञानात अद्यावतपणा आणण्यासाठी विविध उद्बोधन वर्ग उजळणीवर्ग त्यांचेकडून पूर्ण करून घ्यावे.

सामाजिक स्थिरतेसाठी मूल्ये ही अत्यंत महत्त्वाची असतात. ती सामाजिक मूल्ये व वैयक्तिक मूल्ये शिक्षकाने आपल्या आचरणातूनच विद्यार्थ्यांपर्यन्त संक्रमित करावी. या शिवाय अध्यापकांकडून पूढील बाबतीत अपेक्षा करता येईल.

१) **विचार**

विचार ही कृतींना दिशा देणारी प्रक्रिया आहे. विचारांवर व्यक्तीच्या अनुभवाचां परिणाम होतो. व्यक्तीचे वर्तन हे सहजासहजी स्वतंत्र्यपणे घडत नाही, तर त्यामागे व्यक्तीचे विचार, विश्वास व समजूती यांचा परिणाम झालेला असतो. पूर्वानुभव, ज्ञान व भौतिक सुविधा यांची सांगड अभ्यासक्रमाला धरुन कशी करता येईल. यादृष्टिने शिक्षकांची विचार करण्याची प्रक्रिया सुरु असते.

एक उत्कृष्ट अध्यापक होण्यासाठी किंवा तयार करण्यासाठी केवळ शिक्षकांच्या बाह्य वर्तनालाच वळण लावणे पूरेसे ठरत नाही. तर त्याच्या निर्णय क्षमतेलाही योग्य दिशा देणे गरजेचे असते. म्हणूनच शिक्षकांच्या विचार प्रक्रियेचे अध्ययन अध्यापनाच्या दृष्टिने महत्त्व आहे. अध्यापकांची पूढील घटकांच्या अनुशंगाने विचार करणे महत्त्वाचे आहे.

१) शैक्षणिक उद्दिष्टांचे आकलन व महत्त्व
२) अध्ययन अनुभूती साठीच्या आशय घटकांची मांडणी
३) उद्दिष्ट्ये व स्पष्टीकरणांचे लिखाण
४) घटक नियोजन पाठनियोजन बाबत
५) मूल्यमापन प्रक्रिया
६) वर्गाध्यापनातील अध्ययन अनुभवाबाबत
७) अध्यापक निर्णय प्रक्रिया
८) वर्गातील अध्ययनार्थीच्या वर्तनाबाबत

गेज यांच्या मते, 'अध्यापन प्रक्रियेतील अनेक घटकांत' परस्पर संबंधाचे अचूक ज्ञान शिक्षकाला असेल तर त्याचा परिणाम त्यांच्या विचार प्रक्रियेवर होतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे वर्गातील वर्तन, वर्गातील परिस्थितीचाही परिणाम शिक्षक विचार प्रक्रियेवर होतो.

क्लर्क आणि पीटरसन यांनी अध्यापक विचार प्रक्रियेतील विविध घटकांचा अभ्यास करुन त्यावरून एक प्रतिमान सूचविले त्यांच्या
या प्रतिमानात दोन क्षेत्र दर्शविली असून



त्यांच्या या प्रतिमानात दोन क्षेत्र दर्शविली असून

- पहिले श्रेत्राचे, निरीक्षण व मापन करता येत नाही मात्र हे तीनही घटक परस्परावलंबी आहेत.
- दुसऱ्या क्षेत्राचे निरीक्षण व मापन करता येते. त्यामुळे त्यावरून अध्यापकाने कशा पध्दतीने विचार करावा हे स्पष्ट होते. अध्यापन प्रक्रियेतील अडचणी व संधी, सोयी सुविधा, अभ्यासक्रम यांचाही विचार अध्यापन प्रक्रियेचे आकलन होण्यासाठी करावा लागतो.

शिवाय अध्यापक विचार प्रक्रियेबद्दल माहिती मिळविण्याची काही तंत्रे अभ्यासणे महत्त्वाचे असते ती तंत्रे पूढीलप्रमाणे सांगता येतात.

अ) अध्यापकाचे प्रकट विचार – यात अभ्यासक्रमाबद्दल व आशय घटकांबद्दलचे त्याचे विचार जाणून घेऊन त्याचे विश्लेषण केले जावे. व नंतर मानसिक प्रक्रियांची निश्चित करावी.

ब) उद्दिपित प्रत्यावहन – अध्यापकाने अध्यापन केलेल्या आशयाचे ध्वनीमुद्रण व चित्रफिती तयार करुन, त्यांच्या विचार अध्यापन प्रक्रियेतील त्रुटी जापुन घेण्यासाठी करावा.

क) धोरणाविषयक माहितीची प्राप्ती – यासाठी अध्यापकासमोर अध्यापनासाठी एखादी कल्पना मांडली जाते. व त्यानुसार कृती, विचार, निर्णयाची नोंद घेतली जाऊन त्याचे विश्लेषन केले जाते.

ड) अध्यापन दैनंदिनी – अध्यापक अध्यापन दैनंदिनीत अध्यापनाच्या संदर्भात जे नियोजन करतात. त्यावरून त्यांच्या विचार प्रक्रियेची घेता येते.

इ) माहितीसंच चौकटी तंत्र –अध्यापकांच्या अव्यक्त उपपत्तीच्या अभ्यासासाठी हे तंत्र वापरले जाते. व्यक्तीवर्तनावर परिणाम करणारी व्यक्तीगत संरचना शोधण्यासाठी ह्या तंत्राचा वापर केला जातो. अध्यापकाला अध्यापन घटकासंदर्भात विविध वाक्ये, शब्द लिहिलेली कार्ड दाखवून या कार्डातून साम्य वाटेल. अशी कार्डे

एकत्र करुन दाखवायची असतात. व त्यावर स्पष्टीकरणही द्यावयाचे असते त्याद्वारे व्यक्तीच्या व्यक्तीगत वैचारीक संरचनेचा अभ्यास केला जातो

वरील माहितीवरून अध्यापकाच्या विचार प्रक्रियेचे मुख्यतः पूढील प्रमाणे तीन गटात वर्गीकरण केले जाते.

१. **अध्यापकाच्या विचार प्रक्रियेचे गट-**

१) अध्यापकाचे नियोजन विषयक गट
२) अध्यापकांचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय
३) अध्यापकांच्या अव्यक्त उपपत्ती आणि विश्वास

अध्यापकांच्या विचार प्रक्रियेला योग्य दिशा मिळाण्यास अध्ययनार्थीचे अध्ययन परिणाम कारक होण्यास मदत होते.

२.**अध्यापक अभियोग्यता** –शिक्षण प्रक्रियेत अध्यापकाचे स्थान आजही अनन्य साधारण असेच आहे. ते त्यांच्या कार्यामुळेच, सामाजिक जडणघडण करण्याचे कार्य त्यांच्या मार्फत घडून येत असल्याने, अध्यापकांच्या अभियोग्यतेचा व दर्जाचा देखील विचार महत्त्वाचा ठरतो.

अध्ययनार्थींच्या परिणामकारक अध्यपनासाठी प्रेरणा देण्याचे कौशल्ये, शैक्षणिक साहित्याचा वापर. करण्याचे कौशल्ये, चर्चा कौशल्ये, अध्यापन कौशल्ये, यात अध्यापक निपूण व पारंगत असावा. मानवी विकासाच्या प्रक्रियेचे टप्पे व अवस्थांची अध्यापकाची माहिती करुन घ्यावी व बदलत्या सामाजिक, शैक्षणिक परिस्थितीनुसार बदलण्याची अध्यापकाने मानसिक तयारी ठेवावी. जागतिक ज्ञानस्त्रोंतांचे भांडार असलेल्या सर्व माध्यमांद्वारे त्याने ज्ञान घ्यावे.



३.अध्यापक व्यावसायनिष्ठता –

प्राचीन काळी अध्यापन एक सेवा, म्हणून केले जात असे आधुनिक काळात मात्र अध्यापकांच्या कार्यासव्यावसायिकतेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. कोणत्याही व्यावसायातील यशस्वीतेसाठी लागू असणारे व प्रमाण निकष, अध्यापन ह्या व्यावसायाला देखील लागू पडतात अध्यापन व्यवसाय हा इतर व्यवसायापेक्षा वेगळा असून, ह्या

व्यावसायाच्या पाठीशी नैतिकता, हे मूल्य आहे. त्यामुळे समाजाचा अध्यापकाकडे व त्याच्या कार्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आदराचा व विश्वासाचा असाच आहे. अध्यापकाने आपल्या अध्यापन ह्या व्यावसायाप्रती एकनिष्ठ राहावे. आपली शैक्षणिक संस्था व अध्ययनार्थी यांच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढ करण्यासाठी कटीबंध राहावे. जोपर्यन्त संस्थेचे अस्तित्व आहे. तो पर्यन्तच आपले अध्यापक म्हणून अस्तित्व आहे. याची जाणीव ठेवावी.

आपल्या अध्यापनाचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी सतत आभ्यासूवृत्तीचा ध्यास घ्यावा. निरीक्षण व अभ्यास करावा. वक्तशीरपणा हा आपल्या कामाचा अविभाज्य भाग बनवावा. अध्ययनार्थी ला दैवत मानून, स्वयं अध्यापनासंदर्भात त्या पध्दतीने त्यांचे जास्तीत जास्त अध्ययन होईल याकडे लक्ष द्यावे.

आपल्या कार्यात गुणवत्ता निर्माण करून संस्थेच्या नावाचा व कार्याचा प्रचार व प्रसार करण्याकडे नेहमी कटाक्ष ठेवावा. वेळोवळी अध्यापनासंदर्भात जी जबाबदारी दिली जाते. त्याबाबत त्याला ओझे न मानता एक संधी समजून स्विकार करावा. आपल्या संस्थेसंदर्भातील गोपनीय बाबींची जाहिर वाच्यता न करता नैतीकतेचे पालन करावे. कार्यतत्परता गुणवत्ता अंगीकारावी. ज्यामूळे आपल्या व्यावसायिक कौशल्यांत वाढ होईल वेळोवेळी अभ्यासक्रमात, पाठ्यक्रमात बदल झाल्यानंतर त्यासंदर्भात आयोजित होणारी प्रशिक्षण सत्रे, उद्‌बोधन वर्ग, व उजळणी दू मध्ये सहभागी होऊन व्यावसायिक ज्ञान वृध्दींगत करावे. अध्यापकांच्या व्यावसायसवृध्दीबाबतच्या आचार संहिता / नियमावलीचे पालन केले जावे.

४.अध्यापक व मूल्ये –

आर.के.मुखर्जी यांनी मूल्यांची केलेली व्याखा म्हणजे 'अभिसंधान अध्ययन व समाजीकरणामुळे आत्मगत झाले वैयक्तीक पसंती दर्जा व अपेक्षा, प्राप्त झालेल्या समाजमान्य इच्छा व ध्येये म्हणजे मूल्ये होत.' कायदे किंवा नियम यापेक्षा मूल्यांवर विश्वास ठेवून समाजातील माणसे जीवन जगतात.

जीवनाच्या विविध अगांसाठी, अर्थव्यवस्था, राजनीती, धर्म, संस्कृती इत्यादी मूल्ये बाबीसाठी निकष पूरवितात. मूल्यांमूळे मनुष्याच्या वर्तनाला तात्विक आधार मिळतो. मूल्यांमुळे सामाजिक स्वास्थ निर्माण होते. सामाजिक व्यवहारात विश्वासाची भावना निर्माण होते. सामाजिक विकासास हातभार लागतो. त्यामुळे मूल्यांना शिक्षणाच्या व अध्यापकाच्या दृष्टीने अतिशय महत्त्व आहे.

सहप्रवृत्ती प्रमाणे मूल्ये ही जन्मजात प्राप्त होत नाही. ती सामाजिक वातावरणातुन बालकात येतात. घरांच्या नंतर बालकांचा सर्वात जास्त कालखंड हा अध्यापकाबरोबर जात असतो. पालकांनतर मूले ही अध्यापकांचा आदर्श समोर ठेवून त्यांचे अनुकरण करतात. त्यामुळे मूल्य विकासावर अध्यापकाचे स्थान हे महत्त्वाचे व प्रमुख आहे. मूल्ये हे केवळ पुस्तकातुनच देता येत नाही. तर सामाजिक वातावरणातूनच मूल्यांचे रोपण बालकामध्ये होत असते. बालकामध्ये विविध सामाजिक व वैयक्तीक मूल्ये निर्मिती करण्यासाठी अध्यापकाने केवळ पुस्तकातुन मूल्ये न रुजवतां स्वतःच्या वर्तनातून मूल्यांची छाप व शिकवण अध्ययनार्थीना द्यावी. त्यासाठी अध्यापकाकडे मूलभूत मूल्ये असावीत. सत्यशिव, सौदर्य, न्याय, क्षमता, स्वातंत्र्य, समता ह्या मूल्यांचा ठेवा अध्यापकाच्या व्यक्तीमत्त्वाचा अनिवार्य भाग असावा.

५. अध्यापक अभिवृत्ती –

- एका विशिष्ट पातळीवर काम करण्यासाठी मनाची सक्षमता वा मनाचा कल म्हणजेच अभिवृत्ती होय.
- अभिवृत्ती म्हणजेच दृष्टिकोन अभिवृत्ती ही व्यक्तीला जन्मजात प्राप्त होत नसते. व्यक्तीला येणारे अनुभव, मिळणारे ज्ञान, अध्ययन अनुभूती या द्वारे अभिवृत्ती विकसित होत असते.

अध्यापक अभिवृत्ती सकारात्मक असणे अध्ययनार्थीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी अत्यंत पोषक असते. त्यामुळे अध्यापकाने आपली अभिवृत्ती ही अध्ययनार्थी केंद्रीत ठेवावी. तसेच मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययनार्थीच्या शैक्षणिक समस्या सोडविण्याचाच विचार करावा. अध्ययनार्थीला ज्ञानाची प्रगलभता देऊन त्यांच्या अध्ययनाची गती वाढविण्यासाठी मदत करावी. समस्या आल्यास त्या दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याचा दृष्टिकोन विकसित करावा. अध्ययनार्थीचे मूल्यमापन निरपेक्ष वृत्तीने करण्यासाठीची भूमिका अंगीकारावी. जातीभेद व भेदाभेद न करता. समानतेच्या तंत्वाचे पालन करावे. शैक्षणिक साधनांचा अध्यापनासाठी वापर करण्याचाच नेहमी दृष्टिकोन ठेवावा. तसेच अध्ययनार्थीच्या समस्या जास्तीत जास्त कशा सोडविता येतील याचाच विचार करून अभिवृत्ती सकारात्मक ठेवावी.

६. अध्यापक श्रध्दा व विश्वास –

कोणत्याही कार्याचे यश त्या कार्यावरील श्रध्दा व विश्वास यावर अवलंबून असते. अध्यापकाने आपल्या अध्यापनाच्या व ज्ञान दानाच्या पवित्र कार्यावर श्रध्दा ठेवावी.

अध्ययनार्थी हे कसेही असले तरी त्याचा स्विकार करून, त्यांच्यात योग्य ते धनात्मक बदल करण्याचा प्रयत्न करावा. बदल हे हळूहळू होत असल्याने आपल्या उद्दिष्ट व ध्येयापासून किंचीतही न ढळता आपले ज्ञानदानाचे कार्य चालू ठेवावे. अध्ययनार्थीचा विश्वास संपादन करून त्यांच्यावर योग्य ती जबाबदारी टाकल्यास अध्ययनार्थी ती पार करण्यासाठी प्रयत्न करतील. यासाठी त्यांना योग्य ते प्रबलन द्यावे. व योग्य वेळी मार्गदर्शन करावे तसेच अध्ययनार्थी हे अध्यापकांच्या ज्ञानाला मानत असल्याने त्यांचा तजोभंग होणार नाही यासाठी अध्यापकाने तत्पर राहावे. त्यांच्या शंका अडचणी सोडविण्यासाठी त्यांना मदत करावी. अध्ययनार्थी अध्यापकावर श्रध्दा ठेऊन त्यांनी अध्यापन केलेल्या घटकाबाबत, ज्ञानाबाबत संदेह न बाळगता ज्ञानार्जन करीत असतात. त्यांच्या ही श्रध्दा व विश्वास भंग होणार नाही याची काळजी अध्यापकाने घ्यावी. आपले आचार विचार व्यक्तिमत्त्व समाजाला व अध्ययनार्थीला प्रेरणादायी होईल असा व्यवहार करावा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात –

‘शिक्षकांनी ऐसे द्यावेत घडे । आपला आदर्श ठेऊनी पूढे ।।
विद्यार्थी घडे चोहूकड । राष्ट्रनिर्मावया ।।’

७. अध्यापक व्यावसायिक समाधान

प्रत्येक व्यक्ती सुखी व समाधानी राहण्यासाठी प्रयत्न करित असते. व त्याच अनुषंगाने व्यावसायिक विविध क्षेत्राची निवड करुन मानसिक समाधान प्राप्त करुन घेत असतो.

कोणत्याही चांगल्या यशस्वी अध्यापकाच्या कार्याचे यश हे त्याच्या अध्ययनार्थीनी मिळविलेल्या यशापयशावरून मोजले जाते. तसेच आपले विद्यार्थी, शिष्य विविध क्षेत्रात कार्यरत असलेले पाहून अध्यापकाला त्याचे समाधान मिळते. शेवटी पैसा, नावलौकीक यापेक्षा समाधान जास्त महत्त्वाचे असते.

जी व्यक्ती आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःला झोकून देऊन कार्य करते ती व्यक्ती समाधानी राहू शकते कारण अध्यापकाने आपल्या अध्यापनाच्या व ज्ञान दानाच्या कार्यातून व्यावसायिक समाधान प्राप्त करावे. मला जे करावयाचे आहे ते चांगले उत्कृष्ट करावयाचे आहे ही जाणीव ठेऊन कार्य करावे. ज्याच्यासाठी आपणाला अध्यापन करावयाचे आहे. त्याच्या मनाच्या स्थितीची, क्षमतेची जाणीव ठेवावी. अध्यापनात दैनंदिन सुधारणाच करावी. रोजचे अध्यापन हे सरस व उत्कृष्टच व्हावे यासाठी अध्यापन पूर्वतयारी करावी. तसेच अभ्यासूवृत्ती व नियोजनाद्वारे अध्यापनाचे उद्दिष्ट साध्य करून व्यावसायिक दृष्ट्या नावलौकिक व समाधान प्राप्त करावे. कारण समाधानी असणे ही मनाची अतिउच्च अवस्था असते. व अध्यापक आपल्या कार्याला न्याय देऊनच व्यावसायिक दृष्ट्या समाधानी राहू शकतो.

संदर्भ सूची –

१) अरविंद दुनाखे : उद्‌न्मुख भारतातील समाज शिक्षण व शिक्षक नित्य नूतन प्रकाशन पूणे २००७
२) निलिमा सप्रे व प्रीती पाटील : शिक्षणातील विचार प्रवाह, फडके बुक हाऊस पूणे
३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज करंदीकर – ग्रामगीता
४) सुरेश करंदीकर मूल्यशिक्षण